# प्रकरण १. भारतीय वास्तुकला

## सिंधू संस्कृती

### पार्श्वभूमी :

भारतीय वास्तुकलेला खऱ्या अर्थाने सिंधू संस्कृतीपासून प्रारंभ झाल्याचे मानले जाते. इ.स. पूर्व काळात सिंधू व रावी नदीच्या खोऱ्यात मोहेंजोदारो (मोहेंजोदाडो) व हडप्पा या शहरांमधील वास्तुरचना म्हणजे तत्कालीन कलावंताची वास्तुकलेतील आश्चर्यकारक कामगिरी आहे. तेथील घरे, धान्यांची कोठारे व स्नानगृहांची रचना हे आदर्श वास्तूंचे नमुने आहेत.

सुमारे ९०-९५ वर्षांपूर्वी या संस्कृतीची थोडीही माहिती उपलब्ध नव्हती. परंतु सिंधू नदीच्या खोऱ्यातील संस्कृती ही भारतातील अतिशय प्राचीन संस्कृती होय. मोहेंजोदाडो व हडप्पाच्या खोऱ्यातील सिंधू व रावी या नद्यांच्या काठी वसलेली ही महत्त्वाची नगरे होती.

आर्यकाळातील भारतीय शहरांचे संशोधन सुरू असताना सिंधू खोऱ्यातील संस्कृतीचा अचानक शोध लागला. इंडियन आर्किऑलॉजिकल सर्व्हे या संस्थेतर्फे हे कार्य हाती घेण्यात आले. सर जॉन मार्शल हे या संस्थेचे संचालक होते.

भारतीय प्राचीन संस्कृतीचा शोध घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या या संस्थेतील संशोधकांना हडप्पा या ठिकाणी काही मुद्रा सापडल्या. या मुद्रांवर प्राण्यांची चित्रे व चित्रमय लिपीत मजकूर कोरलेला होता, म्हणून मोठ्या उत्साहाने इ.स.१९२१ मध्ये श्री. रायबहादूर दयाराम सहानी यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात उत्खनन करण्यात आले. तेव्हा हडप्पा येथे एक मोठे शहरच जमिनीखाली गाडले गेले असल्याचे आढळले. या शोधामुळे हडप्पापासून ४०० मैल अंतरावर असलेल्या मोहेंजोदाडो या नगरात उत्खनन कार्य हाती घेण्यात आले. इ.स. १९२२ मध्ये राखालदास बॅनर्जी यांनी मोहेंजोदाडो या नगरात चाललेल्या उत्खननाच्या संशोधन कार्यातून पुरावे गोळा केले. या कार्यात एम. एस. व्हॅटस व श्री. जी. मुजुमदार यांनी नवे क्षेत्र निवडण्याचे ठरवले. श्री. मुजुमदारांना या उत्खननात चन्हुदारो या छोट्या भूमिगत शहराचा शोध लागला.

मोहेंजोदाडो व चन्हुदारो ही नगरे स्वातंत्र्यपूर्वकालीन भारतात असलेल्या सिंध प्रांतात सापडली तर हडप्पा हे नगर पंजाब प्रांतात सापडले.

या प्रदेशात केलेल्या उत्खननावरून आणि तेथे सापडलेल्या विविध अवशेषांवरून सिंधू संस्कृतीचे क्षेत्र फारच व्यापक असल्याचे ध्यानात आले. वायव्य सरहद्द प्रांत आणि हिमालयाच्या पायथ्यालगतच्या प्रदेशापासून ते दक्षिणेला गुजरात, सौराष्ट्रपर्यंत आणि पूर्वेला गंगा नदीच्या खोऱ्यापर्यंत या प्राचीन संस्कृतीची व्याप्ती होती.

### वास्तुकला

सिंधू संस्कृती संपन्न नागरी संस्कृती होती. उत्खननात उपलब्ध अवशेषांवरून या लोकांनी वास्तुकला आणि नगररचनाशास्त्र या क्षेत्रात आश्चर्यकारक कामगिरी केल्याचे दिसून येते.

### नगररचना

या नगररचनेचे लक्षात येणारे पहिले कौशल्य म्हणजे रस्ते. मोहोंजोदाडो व हडप्पा या नगरातील रस्ते सामान्यपणे अगदी सरळ एकमेकांना काटकोनात छेदणारे असत. मात्र काही रस्त्यांच्या सरळपणाला वाकडी वळणे मिळालेली आढळतात. हे रस्ते पूर्व पश्चिम आणि दक्षिणोत्तर आहेत. वाऱ्याची दिशा पाहून रस्त्याची अशी योजना केली असावी असे वाटते.



मुख्य रस्त्याची रुंदी १० मीटरपर्यंत होती. छोटे रस्ते २.७ मीटर ते ३.६ मीटर यांच्या आसपास आढळते. तर गल्ल्यांची रुंदी कमीतकमी १.२ मीटर आढळते. रस्त्याच्या दोन्ही बाजूस घरे बांधलेली आढळतात. नगरातील मुख्य रस्ते विटांच्या तुकड्यांचा थर देऊन मजबूत केले जात. तसेच रस्त्यांच्या दुतर्फा बंद गटारे असत.

### घराचे बांधकाम

वास्तूचे बांधकाम करण्यासाठी भाजलेल्या व पक्क्या विटांचा वापर केला आहे. घरे एकमजली व दुमजली असत. बांधकामासाठी येथे दगड उपलब्ध नव्हता.

सर्व जमीन पुरामुळे जमा होणाऱ्या गाळाची आहे. त्यामुळे इमारती पक्क्या विटांच्या आहेत. विटांचे आकार प्रमाणबद्ध असत. घरासाठी वापरावयाच्या विटा आणि रस्ते व गटारांसाठी लागणाऱ्या विटा यांच्या



आकारात फरक असे. इंग्रजी “L” अक्षरासारख्या आकाराच्या विटा इमारतीचे कोपरे बांधण्यासाठी बनवल्या जात. भिंतींना चिखलाच्या किंवा जिप्सम मिश्रित मातीचा गिलावा केला जाई. घराच्या भिंती जाड असत. रस्ते व गटारे बांधण्यासाठी थोड्या वेगळ्या प्रकारच्या मोठ्या विटा असत. साधेपणा हे मोहेंजोदारो आणि हडप्पा येथील घरांचे वैशिष्ट्य आहे.

घराच्या भिंतीवर विटांची सौंदर्यपूर्ण रचना केली जाई. घरांना फारशा खिडक्या नसत व असल्या तर अंगणासमोरच्या भिंतीला असत. घराची प्रवेशद्वारे बाजूच्या लहान गल्ल्यांत असत. मुख्य रस्त्याच्या बाजूला कोणतेही दरवाजे किंवा खिडक्या नाहीत. आक्रमणापासून संरक्षण हा दृष्टिकोन यामागे असावा. घराची छपरे सपाट असत. पाण्याचा निचरा व्हावा अशी त्याची रचना केली जाई. घरांची रचना एका मध्यवर्ती चौकाभोवती केलेली असे. तेरा एकर क्षेत्रावर मोहेंजोदारो शहर बांधण्यात आले होते. तीन वेळा हे शहर वाहून गेले व तीनदा ते नव्याने बांधले गेले. येथील काही घरे भव्य व प्रशस्त आहेत, तर काही एका मोठ्या खोलीची आहेत. मोठ्या घरात अनेक खोल्या आणि दालने आहेत. एका कोपऱ्यात स्वयंपाकघराची व्यवस्था आहे. लहान घरात पार्टिशनची एक भिंत असे. अंगणामध्ये विटांची फरशी केलेली आहे.

### पाणी पुरवठा व सांडपाण्याची व्यवस्था

येथील नगररचनेचे खास वैशिष्ट्य म्हणजे पाणी पुरवठ्याची व सांडपाण्याची उत्कृष्ट व्यवस्था होय. प्रत्येक घरात कमीतकमी एक तरी स्नानगृह असे व ते रस्त्याच्या बाजूला असे. स्नानगृहातील जमीन विटांनी आच्छादून टाकली जाई आणि एका कोपऱ्याकडे तिला उतार असे. लहान लहान गटारांतून येथील सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था केली होती. रस्ते व गल्ल्यांमधील गटारे मुख्य गटारांना जोडली होती. सांडपाणी, तसेच पावसाचे पाणी मोठ्या कमानयुक्त गटारांतून नगराच्या बाहेर सोडण्याची



व्यवस्था केलेली होती. विटा किंवा दगडांनी गटारांना आच्छादन केलेले असे.

गटारे साफ करण्यासाठी किंवा तपासून पाहण्यासाठी ठरावीक अंतरावर बाजूला काढता येण्यासाठी विटांची आच्छादने किंवा झाकणे (Manholes) असत. कमानयुक्त गटारे ही मुख्य रस्ते व पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी असत. कारण सिंधू खोऱ्यात मुबलक पाऊस पडत असे. या गटारांची रुंदी०.७५ मीटर आणि उंची १.२ मीटर व १.५ मीटर यांच्या दरम्यान असे.

प्रत्येक घरात पाणी पुरवठ्यासाठी एक छोटी विहीर असे. शिवाय वर ४-५ घरांसाठी सार्वजनिक विहीर होती. अशा रितीने नागरिकांना मुबलक पाणी उपलब्ध होते. अतिप्राचीन संस्कृतीचा विचार करता, सिंधू खोऱ्यातील आरोग्य रक्षणाची योजनाबद्ध व्यवस्था, नगररचना, कौशल्य पाहण्यासारखे होतेच, विशेष म्हणजे इतर प्राचीन संस्कृतीत अशा प्रकारची व्यवस्था कोठेच आढळत नाही.

## सार्वजनिक इमारती

मोहेंजोदाडो व हडप्पा या दोन्ही शहरांच्या पश्चिम बाजूस तटबंदीयुक्त बालेकिल्ले (catadels) आहेत. त्यात सभागृह, धान्याची कोठारे, धार्मिक समारंभाच्या इमारती यासारख्या सार्वजनिक स्वरूपांच्या इमारती आहेत.

त्यांपैकी महत्त्वाची वास्तू म्हणजे मोहेंजोदारो येथील स्नानगृह होय.

## मोहेंजोदारो येथील सार्वजनिक स्नानगृह

मोहेंजोदारो येथील सार्वजनिक स्नानगृह हा सिंधू खोऱ्यातील नगर रचनेचे व वास्तुकलेचे खास वैशिष्ट्य होय. इ.स.पूर्व १८२५-२६ मध्ये उत्खनन करत असताना सर जॉन मार्शल यांना हे सापडले. हे स्नानगृह मोठे वैशिष्ट्यपूर्ण आहे. या स्नानगृहाचे बांधकाम भाजलेल्या पक्क्या विटांचे असून त्याची लांबी, रुंदी व खोली अनुक्रमे ११.७० मीटर आणि ६.९ मीटर व २.४० मीटर आहे.

दोन्ही बाजूंनी पायऱ्या उतरून या स्नानगृहात प्रवेश करता येतो. त्यात एक मध्यवर्ती आयताकृती तलाव असून त्याभोवती कट्टा आहे. तलावातील पाणी बाजूच्या भिंतीत मुरू नये म्हणून जिप्सम मिश्रित चुन्यात भिंतींचे बांधकाम केले आहे. भिंती जलभेद्य झाल्यामुळे पाणी मुरत नाही. स्नानगृहाच्या उत्तरेला चार आणि दक्षिणेला चार असणाऱ्या या खोल्यांमधून सांडपाणी बाहेर टाकण्याचा मार्ग होता.

या खोल्या समोरासमोर असल्या तरी स्नान करणाऱ्या व्यक्ती एकमेकांना तसेच तिसऱ्या व्यक्तीला दिसू नये अशी रचना केली होती.

स्नानगृहाच्या आग्नेय दिशेला एका खोलीत असलेल्या दीर्घवर्तुळाकार विहिरीतून पाणी पुरवठा केला जात असावा. तलावातील घाण पाणी काढून टाकण्याची व ताजे व स्वच्छ पाणी भरण्याची खास



सोय केली होती. स्नानगृहाच्या नैऋत्येकडील कोपऱ्यात चौकोनी विवरमार्ग किंवा तळमोरी होती. त्यातून पाणी काढून टाकले जाई. स्नानगृहाच्या पूर्वेलाही एका खोलीत एक मोठी विहिर होती व तिचा उपयोग तलावात स्वच्छ पाणी भरण्यासाठी होत असावा. स्नानगृहाच्या निर्मितीचा हेतू जलविहाराचा, चैनीचा नसावा. स्नान करणे हा सिंधू संस्कृतीच्या आचार पद्धतीचा एक भाग असावा.

सार्वजनिक स्नानगृह आकाराने मोठे असले तरी त्याचा नेहमी उपयोग केला जात नसावा. प्रत्येक घराला स्नानगृह असल्यामुळे अशा प्रकारच्या मोठ्या सार्वजनिक स्नानगृहाचा वापर धार्मिक उत्सवांच्या प्रसंगीच केला जात असावा.

## मौर्यकाळ

सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतर आर्यांच्या काळापर्यंत वास्तु इतिहासाची फारशी माहिती मिळत नाही तसेच सम्राट अशोकाच्या काळात वास्तुनिर्मितीसाठी माती व लाकूड या लवकर नष्ट होणाऱ्या माध्यमांचा वापर केल्यामुळे त्या काळातील वास्तु नमुने बघावयास मिळत नाहीत. परंतु ग्रीक राजदूत मॅगेस्थेनीस व चिनी यात्रेकरू फा-हियेन यांनी पाटलीपुत्र येथील शहर रचना व चंद्रगुप्ताचा लाकडी राजवाडा यांबद्दल लिहून ठेवलेल्या माहितीवरून तत्कालीन वास्तुकलेच्या भव्यतेची व सौंदर्याची आपणास कल्पना येते.




तटबंदीचे अवशेष

त्यानंतर मौर्यकाळात वास्तुसाठी दगडाचा वापर सम्राट अशोकापासून सुरू झाला व त्यामुळे आज मौर्यकालीन काही वास्तु व शिल्प शिल्लक राहिले. डोंगर पोखरून स्थापत्य निर्मितीची सुरुवात सम्राट अशोकाच्या वेळी झाली. साधूंना आत्मचिंतनासाठी मुद्दाम डोंगर खोदून मानवनिर्मित गुहा निर्माण केल्या. लोमश ऋषीची गुहा हे त्याचे चांगले उदाहरण आहे. बौद्धकालीन कालखंडात सम्राट अशोकाच्या राजवटीत प्रथमच गुहामंदिरे खोदण्यात आली. बौद्धधर्मीय प्रार्थनास्थळे व संमेलनचर्चा यासाठी चैत्यगृह व भिक्षुंना राहण्यासाठी विहार अशा गुहांच्या दोन प्रकारांची निर्मिती झाली. त्यानंतर गुहामंदिरांच्या परंपरेत कार्ले, भाजे, पितळखोरे इत्यादी लेण्यांची निर्मिती झालेली दिसते. अशोकाच्या काळातील स्तूपांची निर्मिती हाही मौर्य वास्तुकलेतील नवा उन्मेष होय. बरहूतचा स्तूप, सांचीचा स्तूप, अमरावतीचा स्तूप ही त्यातील आदर्श उदाहरणे आहेत. लोकांना समजेल अशा पाली भाषेत त्यावर शिलालेख कोरले आहेत. स्तंभलेख, गुहालेख आणि गिरीलेख असे या शिलालेखांचे प्रकार होते. ज्या ठिकाणी शिला उपलब्ध नव्हत्या तेथे एकसंध दगडी स्तंभ उभारले. सिंहस्तंभ, वृषभस्तंभ ही त्याची उदाहरणे आहेत.

भारतीय वास्तुकला परंपरेत गुप्तकाळातील हिंदू मंदिर निर्मिती हा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. या काळात वास्तुशास्त्रावर काही ग्रंथ लिहिले गेले. त्यातील मानसार व भुवन प्रदीप हे ग्रंथ आदर्श मानले जातात. गुप्तकाळानंतर वेगवेगळ्या राजवंशांमध्ये भारतीय वास्तुकला ही अधिक बहरत गेली. सदर प्रकरणात आपण मौर्यकालीन वास्तू ते गुप्तकालीन वास्तूंचा अभ्यास करणार आहोत.

### लोमश ऋषींची गुहा :

बिहार राज्यातील बाराबर डोंगरातील लोमश ऋषींची गुहा ही इ.स.पूर्व तिसऱ्या शतकातील मौर्यकालीन प्राचीन वास्तू म्हणून ओळखली जाते.



लोमश ऋषींची गुहा

त्या गुहेचे प्रवेशद्‌वार ही तत्कालीन लाकडी दरवाजाची दगडात कोरलेली प्रतिकृती आहे. दरवाजाच्या वरील बाजूस दर्शनी भागावर उठावात कोरलेली अश्वनालाकृती कमान आहे. तिच्या आतील अर्धगोलाकार पट्टीमध्ये उठावात कोरलेल्या हत्तींच्या रांगा दोन्ही बाजूंनी मध्याकडे येत आहेत असे दिसते. या पट्टीच्या वरील भागात अर्धवर्तुळाकृती जाळी कोरलेली आहे. त्यामागे गुहेत प्रकाश आणि शुद्‌ध हवा खेळती रहावी हा उद्‌देश असावा.

शिल्पपट्‌ट्यांच्या दोन्ही बाजूस आतल्या बाजूने झुकलेले दोन उभे खांब आहेत. अर्धवर्तुळाकृती कमानीच्या आत एक ठेंगणे प्रवेशद्‌वार आहे व त्याच्या चौकटीच्या उभ्या बाजूही आतील बाजूस झुकलेल्या आहेत.

ही गुहा विहाराच्या स्वरूपाची म्हणजे भिक्षूंच्या निवासासाठी तयार करण्यात आली आहे. तिच्या आतील भागात एक मोठी खोली व तिच्यामागे एक लहान अरुंद खोली एवढी दोनच दालने आहेत. भिंतीवर कोणत्याही प्रकारची सजावट नाही. मात्र भिंतीच्या पृष्ठभागावर दगड घासून आरशासारखा गुळगुळीतपणा आणलेला दिसतो. हीच मौर्यकाळातील सुप्रसिद्‌ध झिलई होय!

या गृहस्थापत्याचा विकास नंतरच्या काळातील गुहामंदिरांत झालेला दिसतो.

## शुंग व कण्व काळ

### पार्श्वभूमी

सम्राट अशोकाच्या मृत्यूनंतर मौर्य वंशाच्या ऱ्हासास प्रारंभ झाला. सम्राट अशोकानंतर गादीवर आलेले राजे दुर्बल असल्याकारणाने या साम्राज्यातील लबान विभाग स्वतंत्र झाले. मौर्य वंशातील शेवटचा राजा आपल्या सैन्याची पाहणी करत असताना त्याचा सेनापती पुष्पमित्र शुंग याने त्याची हत्या करवून तो स्वतः मगध देशाचा राजा झाला.

तो शुंग वंशाचा असल्याने शुंग घराणे मगधच्या गादीवर आले. त्यांनी वैदिक धर्माचा पुरस्कार केला. या वंशाचा शेवटचा राजा देवभूमी हा व्यसनी व कर्तृत्वशून्य होता. त्याचा वसुदेव कण्व या प्रधानाने खून केला व कण्व वंशाची सत्ता प्रस्थापित केली. एकूण ११२ वर्षे शुंग वंशाचे राज्य चालले व कण्व सत्ता अल्पकाळ म्हणजे ३६ वर्षे टिकली. इ.स.पूर्व २८ मध्ये सातवाहन राजाने मगधावर स्वारी केली. शुंग-कण्व काळातील राजांनी वैदिक धर्माला पाठिंबा दिला होता. परंतु तरीही हा धर्म जनतेच्या मनाची पकड घेऊ शकला नाही. कारण जनतेच्या मनावर बौद्‌ध व जैन धर्माच्या अहिंसक शिकवणीचा प्रभाव पडला होता. लोकाश्रयामुळे बौद्‌धकलेचा विकास झाला. बरहूत, सांची व बुद्‌धगया येथील स्तूपांचा विस्तार याच काळात झाला.

### स्तूप म्हणजे काय

स्तूप म्हणजे गौतम बुद्‌ध, बुद्‌धांचे अनुयायी, भिक्षू किंवा महापुरुषाची विशिष्ट आकाराची समाधी होय. स्तूपाच्या रूपाने बुद्‌धांचा संदेश व जीवन सतत जनतेसमोर रहावे हा स्तूप उभारण्यामागचा मुख्य उद्‌देश असावा. कलात्मकदृष्ट्याही हे स्तूप विशेष प्रसिद्‌ध आहेत.

लोकांनी स्तूपांना भेटी द्याव्यात म्हणून विविध नगरांमध्ये मुख्य रस्त्याच्याजवळ सम्राट अशोकाने अनेक स्तूप उभारून त्यांना भेटी देण्याचा प्रघात सुरू केला.

प्रागैतिहासिक काळात मृत व्यक्तिच्या शरीराचे दफन किंवा दहन केल्यावर त्या अवशेषावर मातीचा किंवा दगडाचा ढिगारा करण्याची प्रथा होती. कदाचित यातूनच स्तूपाचा विशिष्ट आकार निर्माण झाला असावा. अशा प्रकारे गौतम बुद्‌ध किंवा बुद्‌ध धर्मातील महान भिक्षू किंवा शिष्य यांच्या अस्थी, रक्षा, केस असे अवशेष जमिनीखाली ठेवून त्यावर स्तूपाची वास्तू बांधण्यात येई.


यात सर्वात खाली चौरस किंवा दंडगोलाकार पाया बांधला जाई. या पायावर एक अर्धगोलाकार दंडाकृती घुमटासारखी रचना असते. खालच्या पायाला मेढी किंवा दंड म्हणत, तर वरच्या अर्धगोलाकार भागाला अंड अशी संज्ञा आहे. हा अंडाकृती भाग थोडा चपटा करीत. या वर्तुळाकाराच्या भागाच्या मध्यावर एक छोटासा चौरस आकाराचा मंडप असे, त्यास हर्मिका म्हणतात. या हर्मिकेच्या मध्यावर एक काठी (यष्टी) उभी करून तिच्यावर एक किंवा दोन छत्र्या असत. या रचनेस छत्रावली असे म्हणतात. स्तूपाचा पाया आणि अंडाकृती भाग हा संपूर्णपणे भरीव असत. आतील भाग हा कच्च्या विटांनी बांधून त्यावर मजबुतीसाठी पक्क्या विटांचा थर व चुण्याचा गिलावा केला जाई.

स्तूपाच्या स्तंभावर प्रदक्षिणा घालण्यासाठी म्हणून स्तूप व वेदिका यांच्यात जी जागा सोडलेली असते तिला प्रदक्षिणा पथ असे म्हणतात. त्याच्या बाहेरील अंगाने कठडे उभारले जात. आत प्रवेश करण्याकरता या कठड्यांना चारी दिशांना चार भव्य व अलंकृत केलेली प्रवेशद्‌वारे असत, त्यांना तोरण असे नाव आहे. दगडी कठड्यांना वेदिका म्हणतात. वेदिकेची रचना प्रत्येक दोन खांबांमध्ये तीन आडव्या पट्ट्या अशी असते.

सुरुवातीस कठडे व तोरणे लाकडी असत, परंतु शुंग व आंध्र काळात हे भाग संपूर्णतः दगडी बनवण्यात आले. प्रारंभीच्या काळात मृताच्या पार्थिव अवशेषावर स्तूपांची रचना करीत, परंतु नंतरच्या काळात पुष्कळ स्तूपाची आवश्यकता भासू लागली. त्यामुळे स्तूप हे बुद्‌धांच्या महानिर्वाणाचे स्वरूप बनले. अनेक गुहा मंदिरांतील मध्ये कोरण्यात आलेले स्तूप या प्रकारचे आहेत. समाधी असे त्याचे स्वरूप नसून एक पूजनीय प्रतीक असेच स्वरूप नंतरच्या काळात राहिलेले दिसते.

स्तूपाच्या भागांची नावे पुढीलप्रमाणे आहेत –

(१) मेढी किंवा दंड – पायाचा चौथारा
(२) बीज – मध्यभागी पुरलेले अवशेष
(३) अंड – अर्धवर्तुळाकार स्तूप वास्तूचा मुख्य भाग




(४) हर्मिका – स्तूपावरील चौथरा
(५) यष्टी – स्तूपावरील दंड
(६) प्रदक्षिणा पथ – स्तूपासभोवतालचा प्रदक्षिणेचा मार्ग
(७) छत्रावली – दंडावरील छाया

(८) वेदिका – प्रदक्षिणेच्या मार्गाभोवतीचा कठडा
(९) तोरण – स्तूपाच्या प्रवेशद्‌वाराची कमान
(१०) स्तंभ – स्तूपाच्या समोरील अशोकस्तंभ

### बरहूतचा स्तूप :

मध्यप्रदेशातील सतना जिल्ह्यातील बरहूत येथे असलेला हा स्तूप काही शतकांनंतर अनास्थेमुळे पडून गेला व नामशेष झाला. इ.स. १८७३ पर्यंत कोणासही या स्तूपाची माहिती नव्हती. इतरत्र पडलेल्या अवशेषांवरून उत्खनन करीत असताना अलेक्झांडर कनिंगघम (Alexander Cunningham) यांना स्तूपाची वेदिका व पूर्व तोरणाचे अवशेष सापडले.



बरहूतच्या स्तूपावरील एक शिल्प

यावरील शिलालेखावरून या स्तूपाचा कालखंड इ.स. पूर्व १५०च्या सुमाराचा मानला जातो. त्यामुळे हा बौद्‌धकालीन स्तूपातील सर्वात आद्य स्तूप समजला जातो. तांबड्या रंगाच्या दगडातील या स्तूपाचा व्यास जवळपास २०.७ मी. असावा असे मानले जाते.

जवळपासच्या खेड्यातील लोकांनी आपल्या घरांसाठी या स्तूपातील दगड व विटा वापरण्यास सुरुवात केल्यामुळे हा स्तूप हळूहळू नामशेष झाला.

या स्तूपाचे अवशेष कोलकाता येथील इंडियन म्युझियममध्ये व काही युरोप, अमेरिकेतील म्युझियममध्ये पाहावयास मिळतात.

अवशेषांत वेदिकेच्या तीन उभ्या खांबांवरील आडव्या, अवजड शिलेवर एका बाजूला कमळांची एक सुंदर मालिका कोरलेली आहे. उमललेल्या कमळपुष्पाभोवती त्यांचे देठ वेटोळ्यासारखे गुंफलेले दिसत आहेत. दुसऱ्या बाजूला त्याच देठांच्या गोफाचा उपयोग विविध प्रसंग एकमेकांपासून वेगळे करण्यासाठी केला आहे. काही वर्तुळाकारात उमललेल्या कमळपुष्पाच्या मध्यावर पागोटे घातलेल्या माणसांची शीर्षे कोरली आहेत. ती विविध राजांची असावीत. इतर वर्तुळाकारांमध्ये वीसहून अधिक जातक कथा आणि बुद्‌धजीवनातील पाच ते सहा प्रसंगांचे शिल्पांकन केलेले दिसून येते. सर्व प्रसंगशिल्पांवर त्यांविषयांची नावे कोरलेली आहेत.

सर्व प्रसंगशिल्पे आणि यक्ष-यक्षिणी यांची शिल्पे उथळ उठावात कोरलेली आहेत. प्रसंगशिल्पात कथनपद्‌धतीचा विशेषत्वाने उपयोग केलेला दिसतो. एकाच शिल्पात एकानंतर एक असे क्रमाने घडलेले अनेक प्रसंग दाखवण्याची ही पद्‌धत होती. मृगजातक, महाकपिजातक, मायादेवीचे स्वप्न, जेतवन विहाराचे दान इत्यादी. वर्तुळाकृती प्रसंगशिल्पे (जातककथा) विशेष उल्लेखनीय आहेत.

### मृगजातक :

शुंग वंशाच्या आमदानीत बरहूत स्तूपावरील बुद्‌धजीवनातील प्रसंग चित्रित करण्यात आले आहेत. त्यात मृगजातक हे प्रसिद्‌ध शिल्प कोरलेले आहे. हे एका कथेवर आधारीत असलेले शिल्प आहे. कथेत घडलेले सर्व प्रसंग एखाद्या कथेप्रमाणे दर्शवले आहेत. मात्र हे सर्व प्रसंग यांची रचना एकाच चित्रअवकाशात केली गेली आहे.

या कथेतील प्रसंग गंगातीरावरील जंगलात घडून आले. आपल्या पूर्वजन्मात बुद्‌ध सुवर्णमृगाच्या रूपाने जन्माला आला होता. हा सुवर्णमृग आपल्या कळपासह पाणी पिण्यासाठी गंगाकिनारी आला होता. तेव्हा त्याला एका सावकाराचा मुलगा नदीच्या पाण्यात बुडत



असलेला दिसला. त्या मृगाने त्याच वेळी पाण्यात उडी घेतली व त्या तरुणाला पाठीवर घेऊन नदीकाठी सुखरूप आणले आणि मृत्युच्या दाढेतून वाचवले. हा प्रसंग शिल्पाच्या खालील भागात शिल्पित केला आहे. त्यात नदीच्या पात्रातील पाण्याच्या लहरी आणि पाठीवर घेतलेल्या तरुणासह काठापर्यंत आलेला सुवर्णमृग दाखवला आहे. कथेतील दुसरा प्रसंग उजव्या कोपऱ्यात कोरलेला आहे. बनारसच्या राणीच्या स्वप्नात तिने तो सुवर्णमृग पाहिला. तिच्या हट्टासाठी त्या मृगाचे ठिकाण दाखवणाऱ्याला राजाने मोठे बक्षीस जाहीर केले. बक्षिसाच्या लोभाने तो कृतघ्न तरुण राजाला घेऊन तेथे आला. तो राजाला सुवर्णमृग दाखवत आहे व राजा धनुष्याला बाण लावून त्या मृगाचा वेध घेत आहे असे दृश्य शिल्पित केले आहे. शिल्पाच्या मध्यभागी कथेतील तिसरा व अखेरचा प्रसंग दाखवला आहे. वेध घेणाऱ्या राजाला पाहताच सुवर्णमृग मनुष्यवाणीने बोलू लागला. त्याचे वक्तव्य ऐकताच आश्चर्याने थक्क झालेल्या राजाने धनुष्यबाण टाकले आणि हात जोडून त्याचा उपदेश ग्रहण केला. शुंग काळातील काही महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये या शिल्पात आढळून येतात ती पुढीलप्रमाणे ;


या शिल्पामध्ये कथन पद्धत वापरण्यात आली आहे. शिल्पाची चित्रशैली वास्तववादी नसून सांकेतिक आहे. ती काहीशी अलंकारात्मक आहे. यामध्ये यथार्थ दर्शनाचा अभाव दिसून येतो. नदी, पाणी, झाडे सर्व घटक सांकेतिक पद्धतीने कोरले आहे. नदी, पाणी, झाडे, पाण्यातील तरंग यातून कथेसाठी आवश्यक वातावरण निर्माण झाले आहे.

हे शिल्प उथळ उठावाचे आहे. तत्कालीन पेहरावातील डोक्यावरील पागोटे, कमरेभोवती गुंडाळलेले व गाठ समोर सोडलेले सोगे ही पोषाखाची खास वैशिष्ट्ये दिसतात. प्रामुख्याने ही अशा प्रकारची शिल्पे वेदिकेवरील उभ्या व आडव्या खांबांवर आहेत त्यामुळे ती खोल उठावात कोरली नाहीत कारण शिल्प खोल कोरल्यामुळे त्या स्तंभाना बाधा येऊ नये म्हणून ही काळजी घेतल्याचे जाणवते.

### शालभंजिका :

बरहूतच्या स्तूपावर अनेक सुंदर शिल्पे निर्माण करण्यात आली. त्याचे काही अवशेष कोलकत्ता कलासंग्रहालयात ठेवण्यात आलेले आहेत. त्यातीलच हे एक शिल्प आहे.

स्तूपाचे वाईट शक्तींपासून संरक्षण करण्याच्या उद्देशाने स्तूपाच्या वेदिकेवर वेगवेगळी शिल्पे साकारण्यात आली. शालभंजिका हे त्यातीलच एक शिल्प आहे. प्रवेशद्वाराच्या कोपऱ्यातील स्तंभावर



किंवा वेदिकेच्या उभ्या खांबावर कोरलेल्या मनुष्याकृती पूर्ण उंचीच्या व उथळ उठावाच्या आहेत. या संरक्षक मूर्ती त्यांच्या नावासह कोरल्या आहेत. अशा मूर्तींमध्ये बरहूत स्तूपाच्या एका वेदिका स्तंभावर यक्षिणीची मूर्ती शालभंजिका म्हणून विशेष प्रसिद्ध आहे. शालवृक्षाला लपेटून असलेल्या स्त्रीच्या आकृतीला शालभंजिका किंवा वृक्षिका असे म्हणतात. बरहूतच्या स्तूपाच्या वेदिकेच्या स्तंभावर ही आकृती उथळ उठावात कोरलेली आहे. ती हत्तीवर उभी असून हत्तीची आकृती प्रमाणाने खूप लहान दर्शवली आहे. तिने उजवा हात वर करून झाडाची फांदी पकडली आहे. एक पाय हत्तीवर तर एका पायाने शाल वृक्षाच्या खोडाला मिठी घातली आहे. तिने डाव्या हातानेही वृक्षाला कवेत घेतले आहे. डोक्यावरील केसांच्या दोन वेण्या घातल्या असून डोक्यात फुलेही माळली आहेत. चेहरा निर्विकार असून कपाळ चपटे आहे. हातात व गळ्यात अलंकार आहेत. पायात पैंजणासारखे अलंकार घातले आहेत.

कमरेभोवती मण्यांचा रुंद कमरपट्ट्यासारखा अलंकार घातलेला आहे. पायात तोडे घातलेले आहेत. वृक्षाला लपेटलेला डावा हात पाय आणि उजव्या पायावर भार देऊन उभी राहण्याची ढब यामुळे संपूर्ण शिल्पाला एक प्रकारचा डौल व लय प्राप्त झाली आहे. प्राचीन काळी वृक्षाची पुजा करण्याची प्रथा होती.

### बरहूतच्या शिल्पाची वैशिष्ट्ये

यक्ष, यक्षिणी, तूलाकोक देवतेसारख्या शालभंजिकांची शिल्पे अप्रतिम म्हणून गणली जातात. चपट्या व उथळ आकृती हे बरहूतच्या शिल्पाचे वैशिष्ट्य आहे. पुरुषाच्या डोक्यावर पगडी हे बरहूतच्या शिल्पाचे वैशिष्ट्य होय. येथील शिल्पाकृती या जीवनातील चैतन्याने व आनंदाने भारलेल्या आहेत. बरहूत येथील शिल्पात कमळ, हरीण, हत्ती, फुले, वेली, वृक्ष इ. आकारांचे सुंदर कोरीव काम केलेले आहे.

भारतीय शिल्पांच्या परंपरेत डिझाईनचा (संकल्प) उपयोग प्रथमच इतक्या विपुल प्रमाणात केल्याचे बरहूत येथील शिल्पांत दिसून येते. निसर्गात आढळणाऱ्या वस्तूंना सुंदर रूप देऊन नक्षीमध्ये गुंफण्याच्या अप्रतिम कौशल्याचे येथे चांगले दर्शन घडते. संकल्प व रचनेची भारतीय कलेतील वैशिष्ट्यपूर्ण ढब येथे प्रथमच दृष्टीस पडते.

मूर्तीच्या अंगोपांगांची गोलाई दगडातूनही प्रतीत होईल अशी शरीराची मुलायमता हेदेखील येथील खास वैशिष्ट्य आहे. या शिल्पात पोशाख़, घरे, उत्सव इत्यादींवरून त्या काळातील सामाजिक रितीरिवाजांचे प्रतिबिंब दिसते.

या स्तूपावरील शिल्पांत शुंगकालीन शिल्पांची सर्व लक्षणे आढळून येतात. बुद्‌धाचे दर्शन कोठेही मानवी स्वरूपात घडवलेले नाही. बुद्‌धाचे अस्तित्व हे प्रतीकांच्या (पादुका, छत्र, धर्म चक्र, बोधिवृक्ष) साहाय्याने सूचित केल्याचे दिसून येते.

बौद्‌धकालीन स्तूपांचे सौंदर्य वाढवण्यात शिल्पकलेचा मोठा वाटा आहे. वास्तुकला आणि शिल्पकला हातात हात घालून येथे नांदताना दिसतात. स्तूप सुशोभित करावेत या उद्‌देशाने येथील शिल्पे कोरण्यात आली असली तरी बौद्‌ध धर्माचा प्रसार आणि बुद्‌धाचा संदेश जनमानसावर ठसावा हाच त्यामागे महत्वाचा हेतू होता.

### सांचीचा महास्तूप

**स्थळ** : सांची (भोपाळ, मध्यप्रदेश)

**कालखंड** : मौर्यकालीन वास्तू इ.स.पू. ३ रे शतक

**विस्तार** : शुंग व कण्वकाळ इ.स.पू. १५०च्या आसपास

**माध्यम** : विटा, दगड

**वैशिष्ट्ये :**

सम्राट अशोकाने बांधलेल्या स्तूपांपैकी हा एक भव्य व प्रसिद्ध स्तूप आहे. या स्तूपाची मूळ वास्तू ही विटांनी बांधली होती. मूळ स्तूप तसाच ठेवून इ.स.पू. १५० च्या सुमारास शुंग, आंध्र व गुप्त काळात अनेक वर्षे याचे बांधकाम व विस्तार सुरू होता. त्यामुळे वेगवेगळ्या राजवटींची वैशिष्ट्ये येथे आढळतात.



सांचीचा महास्तूप

स्तूपाच्या वेदिकेसह विस्तार १२० फूट व्यास असून त्याची उंची ५४ फूट एवढी आहे. मेढी ४.८० मीटर उंचीची असून तेथे दुसरा प्रदक्षिणापथ आहे व त्याच्याभोवतीही कठडे आहेत. प्रदक्षिणा पथावर येण्यासाठी दक्षिणेच्या बाजूला दोन सोपान (जिने) आहेत.

घुमटावर हर्मिका असून यष्टीवर तिला तीन छत्रावली आहेत. स्तूपाच्या चार बाजूंना प्रवेशद्वारे असून त्यास 'तोरणे' असे म्हणतात. या तोरणांची प्रत्येकी उंची जास्तीत जास्त १०.२० मीटर आहे. तोरणाच्या उभ्या दोन व आडव्या तीन दगडी पट्ट्यांवर अतिशय सुंदर असे शिल्पकाम केलेले आहे. त्यामध्ये बुद्धाच्या जीवनातील व जातक कथांमधील प्रसंग कोरलेले आहेत.

सांचीची उठाव शिल्पे ही बरहूत, बुद्धगया येथील शिल्पांपेक्षा उच्च उठावाची आहेत. त्यामुळे आकृती अधिक सजीव वाटतात. दगडातील खोदकामातही शिल्पकाराने चांगले प्रावीण्य मिळवल्याची साक्ष पटते. शालभंजिका व यक्षिणींची शिल्पे उल्लेखनीय आहेत. सुरुवातीला तोरण लाकडी होते. सध्या असणारी दगडी तोरणे आंध्र राजांनी उभारली आहेत.



तोरण

येथील शिल्पांत लोकजीवन, धार्मिक उत्सव, घरे, झोपड्या, तटबंदी, ग्रामीण लोकांचे व्यवसाय, विविध प्राण्यांचे आकार, सरोवरे अशा अनेक पैलूंचे शिल्पांकन आढळते. शिल्पांकन हे बुद्धाच्या जीवनाशी निगडित असले तरी बुद्धाचे अस्तित्व कोठेही मनुष्यरूपात न दाखवता प्रतीकात्मक रूपात दाखवले आहे.

बरहूतच्या शिल्पांची ह्या शिल्पांशी तुलना केल्यास स्पष्टपणे लक्षात येते की, येथे शिल्पकलेने प्रगतीचा पुढचा टप्पा गाठला होता. सर्व तोरणे म्हणजे अलंकृत शिल्पाचा उत्कृष्ट नमुना आहेत. डौलदार मनुष्याकृती, गोल चेहरा, सौंदर्यपूर्ण अलंकार व केशसंभार ही सांचीच्या शिल्पांची वैशिष्ट्ये होय.

## बौद्ध स्थापत्याचे प्रकार

### ● चैत्य व विहार :

**चैत्य :** सम्राट अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रचारार्थ अनेक गुहा, स्तूप व वास्तू उभारल्या. त्यात कोरलेल्या प्रार्थनेच्या व चर्चा प्रवचनांच्या जागेला चैत्य असे म्हणतात. चैत्याची रचना म्हणजे आयताकार सभागृह. यात स्तंभयुक्त दालन, त्यात स्तूपाच्या पाठीमागे अर्धवतुळाकार भिंत, स्तूपाला प्रदक्षिणा पथ व उभे

राहून प्रार्थना करण्यासाठी स्तूपाच्या समोर असणारी मोकळी जागा व गजपृष्ठाकार छत अशी सर्वसाधारण रचना असते.

**विहार** : सम्राट अशोकाने वरीलप्रमाणेच उभारलेल्या वास्तूंपैकी बौद्ध धर्मगुरूंना शांत, एकांत मिळावा या दृष्टिकोनातून त्यांच्या राहण्यासाठी गुहा कोरून घेतल्या. त्यांना विहार असे म्हणतात. या खोलीत झोपण्यासाठी एक चौथरा व कोपऱ्यात दिवा ठेवण्यासाठी सोय एवढाच भाग दिसतो.

पुढे-पुढे बौद्ध धर्मगुरूंची संख्या वाढल्यामुळे दोन मजली किंवा तीन मजली विहारांची रचना करण्यात येऊ लागली. पटांगणाच्या तिन्ही बाजूंना राहण्याची व्यवस्था केलेली असेल तर यास 'संघाराम' म्हणजेच अनेक भिक्षूंची एकत्र (संघाने) राहण्याची व्यवस्था.

- **हीनयान पंथ, महायान पंथ – (वास्तू व शिल्पकलेवरील प्रभाव) :**

**हीनयान पंथ** : गौतम बुद्धांनी आपल्या अनुयायांना धर्माचे आचरण करण्यासाठी काही नियम घालून दिले होते. त्यात त्यांनी स्वतःची म्हणजेच गौतम बुद्धांची कोणत्याही प्रकारची प्रतिमा निर्माण करण्यास बंदी घातली होती. या नियमांचे काटेकोरपणे पालन करत अनुयायांनी बुद्ध प्रतिमांच्या ऐवजी वास्तूशिल्पकलेत गौतम बुद्धांचे अस्तित्व दाखवण्यासाठी मोकळे सिंहासन, स्तूप, चक्र, हत्ती, घोडा, सिंह, वृषभ, पादुका इत्यादी प्रतीके वापरली आहेत.

**महायान पंथ** : पुढच्या काळात म्हणजेच अलेक्झांडरच्या स्वारीनंतर ग्रीक शिल्पांच्या सहवासात आल्यानंतर त्यांच्या सौंदर्यपूर्ण देवतामूर्ती पाहून बुद्ध अनुयायांनी गौतम बुद्धांच्या प्रेमापोटी बुद्ध मूर्ती मानवी स्वरूपात निर्माण करून घेण्यास सुरुवात केली. या नंतरच्या कालखंडात अनेक सुंदर-सुंदर बौद्ध मूर्ती घडवण्यात आल्या.

भारतीय वास्तूकलेचा विकास हा गुहा मंदिरे, कोरीव व बांधीव मंदिरे आणि चैत्य-विहार-स्तूप यांद्वारे झाला.

## गुप्त काळ


### अजिंठा येथील चैत्यगृह : (गुहा क्र. १९)

गुप्तकालीन वास्तू या गुहामंदिरे व बांधीव मंदिरे अशा दोन्ही प्रकारांच्या होत्या. अजिंठ्यातील काही गुहांची निर्मिती या काळात झाली. गुहामंदिरांपैकी अजिंठा येथील गुहा क्र. १९ ही अप्रतिम चित्रकला, शिल्पकला व स्थापत्यकलेसाठी विश्वविख्यात आहे.

अजिंठा लेणी औरंगाबादपासून सुमारे ११० कि.मी. अंतरावर आहेत. इ.स. १८२४ साली ब्रिटिश अधिकारी लेफ्टनंट जे. ई. अलेक्झांडर हा त्या दरीकडे शिकार करण्यासाठी गेले होते, सध्या ज्याला व्ह्यू पॉइंट (view point) म्हणतात त्या लेणीसमोरच्या पहाडावर उभे असताना त्याला लेणी क्र. १०ची भव्य कमान दिसली आणि या लेण्यांचा शोध लागला.

येथे हीनयान व महायान पंथातील लहानमोठ्या अशा एकूण ३० बौद्ध लेण्या आहेत. त्या सर्व इ.स. पहिले शतक ते इ.स. सहावे शतक या काळातील आहेत.

अजिंठा येथील १९ व्या क्रमांकाची गुहा ही गुप्तकालीन वास्तू आहे. या महायान पंथातील लेणीचे प्रवेशद्वार व त्यावर अश्वनालाकृती खिडकी असून आत सभामंडप व त्याच्या दोन्ही बाजूंस स्तंभांच्या



अजिंठा येथील चैत्यगृह (गुहा क्र. १९)

रांगा आणि पलीकडे दोन पाखी, समोर अर्धवर्तुळाकार जागेत स्तूप व त्यासभोवार प्रदक्षिणा पथ असून आतील स्तंभांच्या दंडाचा मुख्य उभा भाग पानाफुलांच्या नक्षीने अलंकृत केलेला आहे.

वरच्या स्तंभशीर्षाखाली एक अमलकासारखा किंवा कमळाच्या आकाराचा गोल भाग नवीन घालण्यात आला आहे. दोन स्तंभशीर्षांमध्ये फारच थोडे अंतर असल्यामुळे त्याची उंच उठावाच्या उत्थित शिल्पांनी अलंकृत केलेली एक सलग आडवी पट्टीच असल्यासारखे भासते. दुसरी नवी भर म्हणजे वरील कमानदार छतामध्ये स्तंभशीर्षांच्या वरील बाजूस कंगणी व त्यावर उभे कोनाडे निर्माण केले आहेत. त्यात उभ्या किंवा बसलेल्या बुद्धमूर्ती आणि नक्षीची तबके (पॅनेल्स) आलटून पालटून कोरलेली आहेत. या सर्वांमुळे येथे अधिक संपन्न कलात्मकता दिसून येते.

येथील स्तूप एकसंध दगडात कोरलेले असून त्यावर खूपच कोरीवकाम केलेले आहे. हा स्तूप जवळजवळ वरच्या अर्धवर्तुळाकार छताला जाऊन भिडला आहे. स्तूपाचा उभा दंडगोलाकार भाग व त्यावरील अर्धगोलाकृती अंड (घुमटासारखा भाग) यांत एक मोठा स्तंभयुक्त कोनाडा करून त्यात उभी बुद्धमूर्ती कोरण्यात आली आहे. नेहमीच्या हर्मिका व छत्रावली यांच्याही वर एक कलश बसवण्यात आला आहे. हे सर्व अलंकरण व मनुष्यरूपातील बुद्धमूर्ती यांवर महायान पंथाचा प्रभाव दिसून येतो.

पूर्वीच्या चैत्यगृहांप्रमाणे येथेही अश्वनालाकृती खिडकी आहे. तिच्या खाली अलंकरण असलेल्या दोन कोरीव स्तंभांवर आधारलेला व सुरेख दुहेरी कंगणी असलेला द्वारमंडप आहे. खिडकीच्या सभोवती व अंगणाच्या भिंतींवर विविध आकारांच्या कोनाड्यांत उंच उठावाच्या बुद्धाच्या व बोधिसत्वांच्या मूर्ती कोरल्या आहेत.



### चित्र व शिल्पकलेच्या दृष्टिकोनातून–

- **बोधिसत्व :** अद्वितीय ज्ञान ग्रहण करण्याची क्षमता थोडक्यात ज्ञानप्राप्तीच्या अगोदरच्या बुद्धाला बोधिसत्व असे म्हटले आहे.
- **बुद्ध :** ज्ञानप्राप्तीनंतरच्या बुद्धाच्या सर्व प्रतिमा योग्याच्या स्वरूपातील, अलंकार विरहित असून ‘चीवर’ हे वस्त्र परिधान केलेल्या आहेत. तसेच या प्रतिमा वेगवेगळ्या भावमुद्रांमध्ये आहेत. त्यामुळे बोधिसत्व आणि बुद्ध ह्या एकाच व्यक्तिच्या प्रतिमा असल्या तरीही त्यांच्या हावभावात, वस्त्रालंकारांत, मुद्रांमध्ये फरक आहे.

चैत्य गवाक्षाच्या दोन्ही बाजूंस यक्ष द्वारपालांची शिल्पे आहेत व त्यांचे सांची आणि बरहूत येथील कठड्यांवरील शिल्पांशी साम्य आहे. अजिंठ्यातील हे चैत्यगृह वास्तुकलेचा आदर्श नमुना म्हणून प्रसिद्ध आहे. आजही तो चांगल्या स्थितीत पाहावयास मिळतो.

### अहिहोळ येथील दुर्गामंदिर :

गुप्तकाळात बांधीव मंदिरांच्या उभारणीचा प्रारंभ झाला. बांधीव मंदिरांपैकी अहिहोळ येथील दुर्गामंदिर अधिक प्रसिद्ध आहे. कर्नाटक राज्यातील बदामी गावाजवळच्या अहिहोळ खेड्यात सुमारे ७० लहानमोठी प्राचीन देवालये आहेत.

येथे मध्यवर्ती सभामंडप, त्यात स्तंभाच्या हारी व त्यांच्या दोन्ही बाजूस दोन पाखी, समोर अर्धवर्तुळाकृती भिंतीवर देवतांच्या मूर्ती अशी चैत्यासारखी मंदिराची रचना आहे.

सभामंडपावर मात्र कमानयुक्त छताऐवजी सपाट छत आहे. तसेच स्तूपासमोर असणाऱ्या प्रदक्षिणामार्गाऐवजी तो मार्ग गाभाऱ्याच्या बाहेरून आहे. या ठिकाणची स्तंभशीर्षे अजिंठ्यातील १९व्या क्रमांकाच्या गुहेतील जाडजूड व बेळकी असलेल्या स्तंभशीर्षासारखी आहेत, पण तितक्या प्रमाणात अलंकृत मात्र नाहीत.



अहिहोळ येथील दुर्गामंदिर

येथील नवे व लक्षणीय वैशिष्ट्य म्हणजे अर्धवर्तुळाकार गाभाऱ्यावर एक लहानसे शिखर आहे. या व तदनंतरच्या काळातील भारतीय मंदिराचे हे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे व त्याचा प्रारंभ येथे झाला असावा.

देवालयाच्या खालचा चौथरा खूप उंच असून, तो उत्थित शिल्पाच्या व सुंदर नक्षीच्या आडव्या पट्ट्यांनी अलंकृत केलेला आहे. काही स्तंभांचे खालील भाग देवतामूर्ती व मानवाकृतींनी सजवलेले आहेत.


### देवगड येथील विष्णुमंदिर :

गुप्तकाळातील बांधीव हिंदू मंदिररचनेचा उत्कृष्ट नमुना म्हणून देवगड या ठिकाणच्या विष्णुमंदिराचा उल्लेख करण्यात येतो. उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश यांच्या सीमेवरील ललितपूर जिल्ह्यात देवगड हे ठिकाण आहे. अत्यंत प्रभावी अलंकरण व सौंदर्यपूर्ण संयोजन यासाठी प्रसिद्ध असलेले हे मंदिर सध्या छिन्नभिन्न अवस्थेत आहे. हे मंदिर बहुधा पाचव्या शतकातील आहे. या मंदिराचे मूळ शिखर १२ मीटर उंचीचे होते. त्याच्या गाभाऱ्याच्या चारही बाजूंस चार अरुंद द्वारमंडप आहेत. समोरचा द्वारमंडप गाभाऱ्यात प्रवेश करण्यासाठी व उरलेल्या तीन बाजूंचे द्वारमंडप केवळ दिखाऊ आहेत. त्यात हिंदू पौराणिक विषयांवरील तीन भव्य उत्थित शिल्पे कोरलेली आहेत. ती नर-नारायण, शेषशायी विष्णू, गजेंद्र मोक्ष अशी आहेत.

या शिल्पांभोवती अतिशय मनोहर अलंकरण असलेल्या शिल्पांकित चौकटी आहेत. आत खोलवर बसवलेल्या उत्थित शिल्पांचे सौंदर्य या चौकटीवरील सुयोग्य कोरीव कामामुळे अतिशय खुलून दिसते. पेटीसारख्या खोल कोनाड्यातील उच्च उठावाची ही शिल्पे रंगमंचावरील दृश्याचा आभास निर्माण करतात. शिल्पांवर छायाप्रकाशाचे सुंदर असे विभाजन करण्याच्या वैशिष्ट्याचा प्रारंभ येथूनच झालेला दिसतो.

आकृतीचा डौल व शरीररचनाविषयक संकेत सारनाथच्या बौद्ध शिल्पशैलीची आठवण करून देतात. तथापि येथील शिल्पांचे नाट्यपूर्ण व वैभवसंपन्न दर्शन पाचव्या सहाव्या शतकातील कोणत्याही बौद्ध शिल्पात आढळत नाही. या मंदिराच्या चबुतऱ्यावर आडव्या पट्ट्यात रामायणातील प्रसंग कोरले आहेत. जावामध्ये अनेक ठिकाणी आढळणाऱ्या रामायण कथेच्या शिल्पांचे हे भारतातील प्राचीन उदाहरण होय.

या मंदिराचे प्रवेशद्‌वार सुंदर अलंकरणासाठी विशेष प्रसिद्ध आहे. नक्षीदार चौकटीच्या वरच्या बाजूस पुढे आलेली सुरेख कंगणी आहे. चौकटीचे उभे स्तंभ चौकोनी, अष्टकोनी व षोडशकोनी असून त्यांना



देवगड येथील विष्णुमंदिर



विष्णुमंदिरातील शेषशायी विष्णू: उत्थित शिल्प

नक्षीने, यक्ष, गंधर्व, अप्सरा इत्यादींच्या आकृत्या कोरून सौंदर्यपूर्ण केलेले आहेत. त्यांवर वेसर किंवा चैत्य पद्धतीचा प्रस्तरपाद आहे. वरच्या बाजूस मध्यभागी शेषाधिष्ठित विष्णूचे उत्थित शिल्प आहे.

शिल्पांचे दोन प्रकार असतात.

**१. उत्थित शिल्प  २. सर्वतोरचित शिल्प**

**१. उत्थित शिल्प –** सपाट पृष्ठभागावर कोरलेले उठावाचे शिल्प म्हणजे उत्थित शिल्प. हे फक्त समोरून पाहता येते.

**२. सर्वतोरचित शिल्प –** जे शिल्प स्वतंत्र असते आणि जे कोणत्याही बाजूने पाहता येते त्याला सर्वतोरचित शिल्प म्हटले जाते. त्याच्या सर्व बाजू कोरून किंवा घडवून पूर्ण केलेल्या असतात.

चौकटीच्या डाव्या व उजव्या बाजूस वर गंगा आणि यमुना यांच्या कोरीव मूर्ती आहेत. अशा मूर्ती हे गुप्तकालीन मंदिरांचे एक खास वैशिष्ट्य आहे. खालच्या बाजूला द्वारपाल देवदेवतांच्या सुंदर मूर्ती आहेत. देवालयाच्या भिंतीचा सपाट भाग व द्वारमंडपाच्या मध्यावरील अलंकारिकपणा यांचा परिणामकारक मेळ येथे साधला गेला आहे.

## मध्ययुगीन भारतीय कला

### हिंदू मंदिराची वैशिष्ट्ये व प्रमुख प्रकार

मध्ययुगात इ.स. ७ ते १३ व्या शतकात वास्तुकलेला सर्वाधिक महत्त्व प्राप्त झाले. भारतात अनेक मंदिरे बांधण्यात आली. या काळात भारतात एकछत्री साम्राज्य नव्हते. गुप्त राजे हिंदूधर्मीय असल्याने हिंदू धर्माला प्राधान्य मिळाले व बौद्ध धर्माची पीछेहाट झाली. या काळात विशेष करून चालुक्य राष्ट्रकूट, पल्लव, पाल–सेन, या राजसत्ता भारतात विविध भागात राज्य करीत होत्या. त्यानंतर गंग, चंदेल, सोळंकी, चोल, होयसाळ, पांड्य इत्यादी राजवंश राज्य करीत होत्या. त्यांनी वाङ्मय, कला व कलाकारांना उत्तेजन दिले.

या काळात मंदिरांचीच प्रामुख्याने रचना करण्यात आली. मंदिराच्या सौंदर्यवृद्धीसाठी शिल्प–चित्र या कलांचा दुय्यम स्वरूपात उपयोग करण्यात आला.

सर्व प्रकारच्या धार्मिक वास्तुनिर्मितीमागे तत्वज्ञानात्मक विचारधारा होती. त्यानुसार इमारतीची अनुविक्षेप, अद्विक्षेप आणि सौंदर्यपूर्ण उपयुक्त रचना केली जाई. मंदिराची इमारत ही केवळ देवतांचे निवासस्थान नव्हे तर त्या देवांचे शारीरिक स्वरूपच आहे. अशी तात्कालीन दृढ भावना होती. देवालय व त्याचे शिखर उंचच उंच बांधण्यामागे वास्तुशास्त्रविषयक गरजेचा किंवा सौंदर्याचा विशेष भाग नाही तर स्वर्ग व पृथ्वी यांना विभागणाऱ्या मेरूपर्वताची प्रतिकृती आहे अशी श्रद्धा आहे.

मंदिरात पूजा उपासना याला जोडून नृत्य, गायन, देवतांचे विविध सोहळे या कारणांमुळे मंदिराच्या रचनेत भर पडली. कालांतराने मंदिर हे तत्व चिंतन, उपासना व अध्ययनाचे स्थान बनले. तसेच ग्रामसभा, न्यायसभा या सामाजिक संस्थांचे स्थान होते. मंदिर हे सामाजिक सांस्कृतिक जीवनाचे प्रमुख केंद्र होते.

गुप्तकाळात मानसार व भुवनप्रदीप या ग्रंथांतून धार्मिक वास्तूची रचना कशी असावी याची सविस्तर

माहिती दिली आहे. वेगवेगळ्या देवतांसाठी सुयोग्य मंदिराची बांधणी, जागेची निवड अशा इतर उपयुक्त वास्तू तपशील या ग्रंथात आढळतो.

### नागर शैली

उत्तर भारतात हिमालयापासून विंध्य पर्वतापर्यंतच्या प्रदेशात आढळणाऱ्या नागर प्रकारच्या या मंदिरांना पाश्चात्यांनी इंडो आर्यन मंदिरे असे नाव दिले.

हिंदू मंदिरांपैकी हा सर्वात प्राचीन व महत्त्वाचा प्रकार आहे.

नागर शैलीच्या मंदिराचे शिखर हा त्याच्या विविध भागांपैकी सर्वात उठून दिसणारा व प्रभावशाली भाग होय. त्याचा आकार शंकूप्रमाणे वर निमुळता होत जाणारा व काहीसा बहिर्वक्र स्वरूपाचा असतो. शिखराच्या मुख्य भागाच्या वर आमलक हा बसक्या लोट्याप्रमाणे दिसणारा भाग असतो. त्यावर उभे कंगोरे असतात. त्याचा आकार रायआवळ्याप्रमाणे असल्यामुळे त्याला आमलक हे नाव दिले गेले असावे. त्याच्यावर टोकदार कळस किंवा आयुध असतो. शिखराचा पाया गोलाकार किंवा गर्भगृहाने संपूर्ण छत व्यापणारा म्हणजे चौकोनी असते. शिखराच्या खालील रचनेत गर्भगृह, अंतराल, सभामंडप, द्वारमंडप किंवा मुखमंडप असे भाग असतात. यामध्ये गर्भगृह सर्वात महत्त्वाचे मानले जाते. कारण त्यातच मुख्य देवतेची मूर्ती असते.

पुढील काळात देवालयाच्या सर्वच भागांवर शिखरे उभारण्यास सुरुवात झाली. तथापि, गर्भगृहाचे शिखर सर्वत उंच आणि इतर शिखरे क्रमाक्रमाने कमी उंचीची दिसून येतात.


पर्वतश्रेणीत दिसणाऱ्या अनेक शिखरांप्रमाणे मंदिराचे एकूण दिसावे असा उद्देश यामागचा असावा.

देवाचे निवासस्थान असलेले मंदिरही पर्वताप्रमाणे उंच आणि अनेक शिखरांनी युक्त असले पाहिजे. या कल्पनेच्या आधारावर हिंदू मंदिराची रचना केलेली दिसते.

नागर प्रकारची मंदिरे मुख्यतः उत्तर भारतात आढळतात. भुवनेश्वर, कोणार्क, खजुराहो, राजस्थान, माउंट अबू, गुजरात-सौराष्ट्र इत्यादी ठिकाणची मंदिरे नागर शैलीची आहेत. या शैलीच्या मंदिररचनेत उभ्या रेघांवर भर दिल्यामुळे ती अधिक उंच भासतात. मंदिराच्या सुशोभनासाठी बाह्यभागावर सुंदर शिल्पे कोरण्यात आलेलीआहे.

भिन्न भिन्न प्रदेशांत नागर मंदिरांच्या बांधणीत खूपच वैचित्र्य आढळते. इतके वैचित्र्य द्राविड मंदिरात दिसून येत नाही. तथापि, त्या सर्व नागर मंदिरांत वर उल्लेखलेली वैशिष्ट्ये समान आहेत.

नागर मंदिराचे गर्भगृह नेहमी चौरस आकाराचे असते. त्याच्या भिंतींचे काही भाग बाहेरून पुढे आलेले असतात. त्यामुळे त्यांचे त्रिरथ, पंचरथ, सप्तरथ आणि नवरथ असे प्रकार होतात. पुढे आलेल्या भागांमुळे चौरसाच्या चार कोपऱ्यांऐवजी गर्भगृहाला अनुक्रमे बारा, वीस, अठ्ठावीस आणि छत्तीस कोपरे निर्माण होतात. कोपरे फक्त भिंतीपुरते मर्यादीत न राहता तसेच शिखरावरही पुढे आलेले दिसतात.




या बहुकोनी रचनेमुळे अनेक कोन प्रतिकोन निर्माण होतात. गर्भगृहाच्या या रचनेला वास्तूशिल्प भाषेत 'रथ' असे नाव आहे. प्रत्येक रथावर बाहेरील शिखर व आमलकाची रचना केलेली असते. पूर्ण विकसित हिंदू मंदिरात गाभारा (विमान), अंतराळ मंडप किंवा सभामंडप, अर्धमंडप असे विविध भाग असतात. गाभारा व त्यावरील शिखर यांना मिळून 'विमान' हे

नाव आहे. स्थळ, काळ व कलाकाराची प्रतिभा यामुळे मंदिराच्या भिंती, शिखरांचे स्वरूप व अलंकरण यांमध्ये विविधता आढळते. यामुळेच ओरिसा शैली, खजुराहो शैली, राजस्थानी शैली अशा उपशैली नागर शैलीत आढळतात.

नागर पद्धतीची मंदिरे मुख्यतः उत्तर भारतात आढळतात. भुवनेश्वरचे लिंगराज मंदिर, खजुराहोचे कंदारिय महादेव मंदिर, कोणार्कचे सूर्य मंदिर, मोढेरा (गुजरात) येथील पार्श्वनाथ मंदिर, खजुराहो, अंबरनाथ मंदिर– ठाणे महाराष्ट्र इत्यादी ठिकाणी नागर शैलीची मंदिरे आढळतात.

### द्राविड शैलीची मंदिरे :

द्राविड हा शब्द भौगोलिक प्रदेशाचा सूचक आहे. 'द्राविड' म्हणण्याचे कारण की कृष्णा नदीपासून कन्याकुमारीपर्यंतच्या दक्षिण प्रदेशात ही शैली सामान्यतः प्रचलित होती. या शैलीत गर्भगृह, अंतराल, सभामंडप व अर्धमंडप किंवा द्वारमंडप अशी मंदिरांची रचना असतेच, तसेच या शैलीचे वेगळेपण मुख्यतः त्या मंदिराच्या विमानातच दिसून येते.

गर्भगृह व त्यावरील शिखर याला 'विमान' असे म्हणतात. गर्भगृह व सभामंडप यांना जोडणाऱ्या चिंचोळ्या भागाला 'अंतराल' अशी संज्ञा आहे. विमानाची रचना चौरस पायावर केलेली असते. प्रामुख्याने शिखर पायऱ्यांनी बनविलेले व सुचिच्या (पिरॅमिड) आकाराचे असते. वरती कमी होत जाण्याच्या मजल्यांना 'भूमी' असे म्हणतात. भूमी ऐकेका देवतेला समर्पित केलेली असते. रथाच्या आकारावरून भूमीची रचना केलेली असते. महाबलीपूरम येथील धर्मराज रथाला फक्त तीन भूमी आहेत. तर तंजावरच्या बृहदेश्वर देवाच्या मंदिराला तेरा भूमी आहेत.

प्रत्येक भूमीवर चारही बाजूस अलंकरणासाठी लहान लहान मंदिराकृतींच्या रांगा तयार केलेल्या असतात, त्यांना 'हार' असे म्हणतात. तसेच प्रत्येक भूमीच्या कोपऱ्यावर संपूर्ण शिखराची लहान प्रतिकृती असते, तिला 'कुट' असे म्हणतात.

प्रत्येक भूमीवरील इतर लहान मंदिराकृतींना 'शाला' म्हणतात. त्यांचा पाया आयताकृती असतो. त्यावर अर्धदंडगोलाकार (बॅरल हॉल्ट) छप्पर असते.

निमुळत्या होत गेलेल्या शिखरांवरील शेवटच्या भूमीच्यावर ग्रीवा नावाचा थोडा आत गेलेला भाग असतो. त्याच्यावर घुमटासारखा गोल किंवा अष्टकोनी आकाराचा स्तूपिका नावाचा भाग असतो. नागर मंदिरातील आमलक व कलश या ऐवजी येथे ही स्तुपीका असते. ती द्राविड मंदिराचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. द्राविड मंदिराचा आणखी एक महत्त्वाचा विशेष म्हणजे गोपूर होय. मंदिराच्या सभोवती मोकळे पटांगण असते. त्याला 'प्राकार' असे म्हणतात.

नंतरच्या काळात जेव्हा परकीय लोकांचे हल्ले होऊ लागले तेव्हा मंदिराच्या सुरक्षेसाठी पटांगणाभोवती उंच तट बांधण्यात येऊ लागले. या तंटातून मंदिरात जाण्यासाठी चारी दिशांना चार प्रवेशद्वारे असत. या प्रवेशद्वारांना व त्यावरील रचनेला गोपूर असे म्हणत. त्याचा अनुविक्षेप 'आयताकृती' असतो.

गोपुराला अनेक मजले असून ते वर निमुळते होत जातात. प्रत्येक मजल्यावर मंदिराच्या विमानासारखे लहान लहान आकार आणि देवदेवतांच्या प्लास्टरने बनवलेल्या व रंगवलेल्या अनेक मूर्त्या असतात. वर सर्वात शेवटी अर्धदंडगोलाकार आडवे छप्पर व त्याच्या वरच्या बाजूस कलशाची एक रांग असते. ही गोपुरे मंदिराच्या मूळ शिखरापेक्षा खूपच उंच असतात. त्याची संख्या त्या त्या प्रदेशांनुसार लहानमोठी असते. उदा. वेरूळच्या कैलास मंदिराला समोरच्या बाजूस एकच गोपूर आहे, तर मदुराईच्या मीनाक्षी मंदिराला नऊ गोपूरे आहेत.

परकीय लोकांना हेच मंदिर वाटे व ते लोक त्याची तोडफोड करत. त्यामुळे आतील मंदिर सुरक्षित रहात असे. द्राविड शैलीतील मंदिरांची उत्कृष्ट उदाहरणे म्हणजे, कांचीचे कैलासनाथ मंदिर, तंजावरचे बृहदेश्वर मंदिर आणि मदुराईचे मीनाक्षी मंदिर.

## वासर शैली

वेसर किंवा वासर शैली ही नागर व द्राविड शैलीच्या मिश्रणातून तयार झालेली आहे. म्हणून या शैलीस शिल्पशास्त्रामध्ये 'मिश्रक' हे दुसरे नाव आहे.

या शैलीचा विकास दूरदूरच्या प्रदेशांमध्ये झाल्यामुळे त्यात प्रादेशिक वैचित्र्य बऱ्याच प्रमाणात पहावयास मिळते. पश्चिम भारतात प्रामुख्याने विंध्य पर्वतापासून कृष्णा नदीपर्यंत ही शैली प्रचलित होती.

वासर शैलीचा सर्वात प्राचीन नमुना म्हणजे महाबलीपुरमचे भीमरथ आहे, असे मानले जाते.

इसवी सनाच्या सातव्या व आठव्या शतकात ऐहोळ व पट्टडकळ या ठिकाणी नागर व द्राविड अशा दोन्ही शैलीतील मंदिरे शेजारीशेजारी उभारली आहेत. त्यामुळे या दोन्हींमधील कल्पनांच्या देवाणघेवाणीतून वासर ही नवीन शैली जन्मास आली असावी असे म्हटले जाते. वासर शैलीच्या मंदिर रचनेवर विशेषतः द्राविड शैलीचा आणि मंदिर शिल्पांवर नागर शैलीचा प्रभाव पडलेला दिसतो.


या शैलीत विमान आणि मंडप असे दोनच प्रमुख भाग असतात. विमानाचे शिखर चौरस असून कमान निमुळत्या होत जाणाऱ्या मजल्यांनी बनलेली आहे. त्यावर शेवटी कळस किंवा अर्धदंडगोलाकार (बॅरेल व्हॉल्ट) असतो. त्या आकाराला गजपृष्ठाकार असे नाव आहे. हा आकार पूर्वीच्या चैत्यगृहावरून घेण्यात आला असावा हे उघड दिसते.

शिखरावर गजपृष्ठाकार असणे हे वासर मंदिराचे प्रमुख लक्षण आहे. या मंदिराचा आणखी एक महत्त्वाचे विशेष म्हणजे मंदिराचा पाया बहुकोनाकृती असतो. प्रारंभीच्या काळात केरळ आणि तामिळनाडू येथील मंदिरे या शैलीत बांधलेली आहे. या शैलीतील प्रसिद्ध मंदिरे म्हणजे हळेबीड येथील होयसाळेश्वर मंदिर, बेल्लूरचे चन्नकेशव मंदिर, सोमनाथपूरचे केशव मंदिर.

प्रारंभीच्या काळात केरळ व तामिळनाडू या भागात वासर शैलीच्या वर्तुळाकार व लंबाकृती देवालयांची निर्मिती झाली. आजही केरळमध्ये अशा प्रकारची मंदिरे आढळतात.

गाभाऱ्याच्या लांबी-रुंदीपेक्षा मंडपाची लांबी-रुंदी जास्त असते. नागरशैलीसारखी भिंतीची रचना रथाकार करून द्राविड शैलीसारखे त्यात अधूनमधून स्तंभ उभारले असतात.

बदामीमध्ये गुहा मंदिरांप्रमाणेच मंदिरेही बांधली. यात नागर आणि द्राविड या दोन्ही शैलीचे मिश्रण आढळते. या ठिकाणचे मलेगिट्टी मंदिर प्रसिद्ध आहे.



दक्षिण भारतीय देवालयाचे विमान कूट आणि शाला

बदामी शिवाय अहिहोळ, पट्टदकल आणि तेर या ठिकाणीही अतिशय सुंदर सुंदर मंदिरे बांधली गेली. यात ऐहोळचे मेगुटी मंदिर पट्टदकलचे संगमेश्वर, पंपनाथ व विरूपाक्ष मंदिर प्रसिद्ध आहे.



नागर



वासर



द्राविड

**प्र.१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

(१) भारतीय वास्तुकलेतील ............... ही वास्तू सर्वात प्राचीन मौर्यकालीन वास्तू म्हणून ओळखतात.

(अ) देवगड येथील विष्णू मंदिर

(ब) लोमश ऋषींची गुहा

(क) अजिंठा येथील चैत्य गुहा क्र. १९

(२) सांचीचा महास्तूप हा ............... या राज्यात पाहावयास मिळतो.

(अ) महाराष्ट्र

(ब) मध्य प्रदेश

(क) उत्तर प्रदेश

(३) गुप्तकाळातील दुर्गामंदिर ............... या ठिकाणी पाहावयास मिळते.

(अ) अहिहोळ

(ब) जबलपूर

(क) भोपाळ

(४) स्तूप म्हणजे ............... होय.

(अ) बौद्ध धर्मगुरूंची समाधी

(ब) बौद्ध धर्मगुरूंचे मंदिर

(क) बौद्ध भिक्षूकांचे निवासस्थान

**प्र.२. खालील आकृतिबंध पूर्ण करा.**

(१)

देवगडचे विष्णू मंदिर

- शेषशायी विष्णू
- नर-नारायण
- ........................

(२)

चैत्य → बौद्ध धर्मगुरूंची प्रार्थनेची जागा

............... → बौद्ध धर्मगुरूंची राहण्याची जागा

**प्र.३. हीनयान पंथातील बौद्धदर्शन व महायान पंथातील बौद्धदर्शन याबद्दल स्वमत लिहा.**

**प्र.४. आपल्या परिसरातील नावीन्यपूर्ण वास्तुबद्दल माहिती लिहा. ती नावीन्यपूर्ण का वाटली ते स्पष्ट करा.**

## सरावासाठी काही प्रश्न

**प्र.१ थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) सम्राट अशोकाच्या काळातील वास्तु नमुने बघावयास का मिळत नाहीत?
२) ग्रीक राजदूत मेगॅस्थेनीस व चिनी यात्रेकरू फा-हियेन यांनी कोणती महत्वाची माहिती लिहून ठेवली आहे?
३) गुहामंदिरे कोणाच्या राजवटीत प्रथमच खोदण्यात आली?
४) शिलालेख कोणत्या भाषेत कोरले आहेत? व का?
५) शिलालेखांचे प्रकार सांगा?
६) मंदिरांच्या दोन प्रकारांची नावे कोणती?
७) बाराबर डोंगरातील मौर्यकालीन प्राचीन वास्तू कोणती?
८) बांधीव मंदिरांचा प्रारंभ कोणत्या काळात झाला? बांधीव मंदिरांपैकी अहिहोळ येथील प्राचीन मंदिराचे नाव सांगा?
९) शिल्पाच्या दोन प्रकारांची नावे सांगा ?
१०) देवगड येथील शेषशायी विष्णू हे शिल्प कोणत्या शिल्पप्रकाराचे उत्कृष्ट उदाहरण आहे?
११) अलेक्झांडर कनिंगघम यांना मध्यप्रदेशातील सतना जिल्ह्यात कोणत्या स्तूपाचे अवशेष सापडले?
१२) वर्तुळाकारातील कथन पद्धतीच्या जातककथांचे शिल्पांकन कोणत्या स्तूपावर केलेले आहे?
१३) तोरण कशास म्हणतात?
१४) सम्राट अशोकाने बांधलेल्या स्तूपांपैकी सर्वात भव्य व प्रसिद्ध स्तूपाचे नाव सांगा?
१५) मृगजातक शिल्पातील सुवर्णमृग हा पूर्वजन्मात कोण होता?
१६) शालवृक्षाला लपेटून असलेल्या स्त्री आकृतीस काय म्हणतात?
१७) बरहूत स्तूप कोणत्या रंगाच्या दगडात बनवला होता?
१८) अहिहोळ मंदिराचे वैशिष्ट्य कोणते?
१९) गुप्त काळातील मानसार व भुवनप्रदीप हे कोणत्या शास्त्रावर लिहिलेले ग्रंथ आदर्श मानले जातात?
२०) लाकडी दरवाज्याची दगडात कोरलेली कलाकृती कोणत्या प्राचीन गुहेचे प्रवेशद्वार म्हणून कोरलेले आहे?

**प्र. २ जोड्या लावा.**

| वास्तूचे नाव | स्थान |
|---|---|
| १) लोमश ऋषींची गुहा | भोपाळ, मध्यप्रदेश |
| २) दुर्गा मंदिर | नागोद जिल्हा (सटाणा) |
| ३) विष्णू मंदिर | अहिहोळ |
| ४) बरहूत स्तूप | देवगड |
| ५) सांची स्तूप | बिहार राज्यातील बाराबर डोंगर |

**प्र.३ माहिती लिहा.**

१) बुद्ध व बोधिसत्त्व.
२) उत्थित शिल्प व सर्वतोरचित शिल्प.
३) बरहूत शिल्पाची वैशिष्ट्ये.
४) सांचीचा स्तूप.
५) चैत्य व विहार
६) महायान व हिनयान पंथ

**प्र. ४ टिपा लिहा.**

१) मृगजातक
२) शालभंजिका
३) सांची स्तूप
४) अजिंठा गुहा क्र.१९